Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक ३१ ] गुरुवार ते बुधवार, ऑक्टोबर १४-२०, २०२१/आश्विन २२-२८, शके १९४३ [पृष्ठे १३, किंमत : रुपये ८.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

# भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

**(भाग चार - ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १३४.

**सदस्य सचिव, प्रस्ताव छाननी समिती तथा सहसंचालक, नगर रचना, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**

क्रमांक प्रा.यो.अम.-कलम-२०(४)-प्र.क्र.अ(१)-सभा १२-सहसंचाअम-११९५-२०२१.—

ज्याअर्थी, अमरावती प्रादेशिक योजना (यापुढे " उक्त प्रादेशिक योजना " असे संबोधले आहे) शासनाच्या नगर विकास विभागाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) (यापुढे " उक्त अधिनियम " असे संबोधले आहे) चे कलम १५(१) अन्वये अधिसूचना क्र. टिपीएस-२८८७-प्र.क्र.१९६-नवि-१३, दिनांक २९ मे १९९३ अन्वये मंजूर केली असून ती दिनांक १५ ऑगस्ट १९९३ पासून अंमलात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रादेशिक योजनेतील परिसर नकाशा, अमरावती मौजे कठोरा बु., ता. जि. अमरावती येथील स. नं. ६/१ पैकी, ६/२ पैकी, ६/३ पैकी मधील ०.८१ हे.आर, स. नं. ८/१/बी, ८/१/डी, ८/२, ८/३, ८/४ मधील ७.७७ हे. आर व स. नं. ९/१, ९/२ मधील २.१४ हे. आर असे एकूण १०.७२ हे. आर क्षेत्र (यापुढे ज्यास " उक्त जमीन " असे संबोधले आहे) कृषी विभागात समाविष्ट आहे ;

आणि ज्याअर्थी, शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१५-प्र.क्र.४९-१५-नवि-१३, दिनांक ६ मे २०१५ अन्वये उक्त अधिनियमाचे कलम २० अन्वये फेरबदलाद्वारे मंजूर प्रादेशिक योजनेमधील १०.०० हेक्टर ते २५.०० हेक्टर पर्यंतच्या जमीन वापर विभाग बदल करण्यासाठी विभागीय स्तरावर प्रस्ताव छाननी समिती (यापुढे " उक्त समिती " असे संबोधले आहे) स्थापन करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त समितीचे दिनांक ०८ जून २०२१ रोजी झालेल्या सभेमध्ये समितीचे सदस्यांचा सल्ला घेतल्यानंतर, शासनाने उपरोल्लेखित दिनांक ६ मे २०१५ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून उक्त अधिनियमाचे कलम २० पोट-कलम (२) मधील तरतुदीनुसार उक्त प्रादेशिक योजनेत उक्त जमीन कृषी विभागातून वगळून खालील अटींच्या अधिन राहून रहिवास विभागात समाविष्ट करणे आवश्यक असल्याचे समितीचे मत झाले आहे. (ज्यांस यापुढे " प्रस्तावित फेरबदल" असे संबोधले आहे).

**अट क्र. १**ः—फेरबदलाखालील क्षेत्राचा अभिन्यास करतांना त्यामध्ये अनिवार्य १०% खुल्या जागेव्यतिरिक्त १०% सुविधा क्षेत्र सोडण्यात यावे. (सदर क्षेत्र त्याच प्रयोजनार्थ जमीन मालक/ विकासक यांना विकसित करता येईल.)

**अट क्र. २**ः—फेरबदलाखालील क्षेत्रात पायाभूत सुविधा पुरविण्याची जबाबदारी जमीन मालक/विकासकाची राहील. (जसे प्रवेशमार्ग, पाणीपुरवठा, विद्युतपुरवठा इत्यादी).

**अट क्र. ३**ः—शासनाने आदेश क्र. टिपीएस-१८१५-प्र.क्र.४९-१५-नवि-१३, दिनांक ६ मे २०१५, दिनांक ११ जून २०१५ व ४ जानेवारी २०१६ अन्वये निर्धारित केल्याप्रमाणे अधिमूल्याचा भरणा करण्याची जबाबदारी जमीन मालक विकासक यांची राहील.

**अट क्र. ४**ः—फेरबदलाखालील जमिनीत जर अभिन्यासात भूखंड पाडून विक्री करणे प्रस्तावित असेल तर अभिन्यासातील मूलभूत सुविधांचा विकास व भूखंड विक्रीसाठी खालीलप्रमाणे बंधने राहतील. जिल्हाधिकारी यांनी सदर बाबींवर नियंत्रण ठेवावे.—

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | अभिन्यास अंतिमतः मंजूर झाल्यानंतर | . . | एकूण २५% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील. |
| (ब) | सुमारे ४०% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | . . | एकूण ५०% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील. |
| (क) | सुमारे ६०% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | . . | एकूण ७५% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील. |
| (ड) | सुमारे ८०% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | . . | एकूण ९०% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील. |
| (इ) | सुमारे १००% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | . . | एकूण १००% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील. |

**अट क्र. ५**ः—तसेच, जर अभिन्यासात समूह गृहबांधणी योजना विकसित करावयाची असेल तर, जिल्हाधिकारी, अमरावती यांनी विहीत केल्यानुसार सर्व मूलभूत सुविधा विकसित झाल्याशिवाय भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येणार नाही.

**अट क्र. ६**ः—वलगांव-रेवसा-कठोरा-नांदगांव पेठ रस्ता रा. मा. ४७ या रस्त्याला समांतर १२ मीटर रुंदीचा सेवा रस्ता सोडणे बंधनकारक राहील.

**अट क्र. ७**ः—वलगांव-रेवसा-कठोरा-नांदगांव पेठ रस्ता रा. मा. ४७ या रस्त्याचे रुंदीकरण करावयाचे असल्याने रुंदीकरण करतांना कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होणार नाही.

**अट क्र. ८**ः—जोड रस्त्याची पातळी ही मुख्य रस्त्याच्या पातळीपेक्षा १५.०० सें.मी. खाली व जोडरस्त्याच्या खाली असलेली मोरी ही १००० मी.मी व्यासाची पाईप मोरी बांधणे बंधनकारक राहील, तसेच रस्त्यावरील पाण्याचा निचरा नजिकच्या नाल्यामध्ये जाण्यास अडथळा येणार नाही.

**अट क्र. ९**ः—रस्त्याच्या कडेला १०० झाडाचे वृक्षारोपणाचे उद्दिष्ट देण्यात येत आहे.

**अट क्र. १०**ः—मुख्य रस्त्यापासून ते पोच मार्गाकरीता सा. बां. अमरावती यांची वेगळी परवानगी घ्यावी लागेल.

**अट क्र. ११**ः—सदर जागा रा. मा. दर्जाच्या रस्त्याकरीता अनागरी क्षेत्रासाठी वाणिज्य प्रयोजनाकरीता रस्त्याच्या मध्यापासून ४०.०० मी. अंतरावर इमारत रेषा व रस्त्याच्या मध्यापासून ५०.०० मी. अंतरावर नियंत्रण रेषा निश्चित करणे बंधनकारक राहील.

**अट क्र. १२**ः—अर्जदाराने पावसाच्या पाण्याचा कृत्रिम पुनः भरण्याकरिता भूजल पुनः भरण्याच्या उपाययोजना करीता बंधनपत्र दिलेले आहे. त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक राहील.

**अट क्र. १३**ः—ग्रामपंचायत कठोरा बु. यांचे दिनांक २३ एप्रिल २०२१ चे पत्रानुसार रहिवाशांना पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी संबंधित लेआउट धारकाची राहील किंवा संबंधित पाणीपुरवठा विभागाला ग्रामपंचायत कठोरा बु. मार्फत प्रस्ताव पाठविण्यात येईल.

वरिल कोणत्याही अटींचे उल्लंघन केल्यास रेखांकन व अकृषक परवानगी रद्द करण्यास पात्र राहील.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २० पोट-कलम (३) च्या तरतुदीनुसार सूचना क्र. प्रा.यो.अम.-कलम-२०(३)-प्र.क्र.ब(१)-सभा ११-२०२१-सहसंचाअम-६९७, दिनांक १५ जून २०२१ अन्वये प्रस्तावित फेरबदलाबाबत जनतेकडून विहीत मुदतीत सूचना/हरकती दाखल करणा-यांना सुनावणी देण्याकरिता व सदस्य सचिव, प्रस्ताव छाननी समिती, अमरावती यांना अहवाल सादर करण्याकरीता उक्त अधिनियमाचे कलम १६२(२) अन्वये “अधिकारी” म्हणून सहाय्यक संचालक, नगर रचना, शाखा कार्यालय, अमरावती यांची नियुक्ती करण्यात आली होती. (यापुढे “ उक्त अधिकारी ” असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, नियुक्त अधिका-याने त्यांच्या दिनांक ६ ऑगस्ट २०२१ च्या पत्रान्वये अहवाल सदस्य सचिव, प्रस्ताव छाननी समिती यांना सादर केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त समितीचे दिनांक ८ सप्टेंबर २०२१ रोजी झालेल्या सभेमध्ये नियुक्त अधिका-याच्या प्राप्त अहवालानुसार उक्त प्रादेशिक योजनेत उक्त जमीन कृषी विभागातून वगळून काही अटींच्या अधिन राहून रहिवास विभागात समाविष्ट करणे आवश्यक असल्याचे समितीचे मत झाले आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या जमीन वापर बदलाच्या धोरणानुसार मौजे कठोरा बु., ता. जि. अमरावती स. नं. ६/१ पैकी, ६/२ पैकी, ६/३ पैकी मधील ०.८१ हे.आर, स. नं. ८/१/बी, ८/१/डी, ८/२, ८/३, ८/४ मधील ७.७७ हे. आर व स. नं. ९/१, ९/२ मधील २.१४ हे. आर ही कृषी विभागातील एकूण १०.७२ हे. आर क्षेत्रासाठी जमीन मालक यांनी जमीन वापर बदलाचे अधिमूल्य शासकीय लेखाशिर्षात दिनांक ३० सप्टेंबर २०२१ रोजी जमा केले असल्याने अट क्र. ३ ची पुर्तता झाली आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाचे निर्णय क्र. टिपीएस-१८१५-प्र.क्र.४९-१५-नवि-१३, दिनांक ११ जून २०१५ अन्वये संबंधित विभागीय सहसंचालक यांना उक्त अधिनियमाचे कलम २०(४) अन्वये अधिसूचना निर्गमित करण्याचे अधिकार प्रत्यायोजित करण्यात आलेले आहे ;

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम २० चे पोट-कलम (४) व त्याअनुषंगाने प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करून सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती उक्त जमिनीबाबत प्रस्तावित फेरबदलास पुढीलप्रमाणे मंजुरी देत आहे व त्यासाठी उक्त प्रादेशिक योजना मंजुरीची दिनांक २९ मे १९९३ ची अधिसूचना पुढीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहे.

" उक्त प्रादेशिक योजना मंजुरीच्या अधिसूचनेच्या फेरबदल नोंदीखालील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नव्या नोंदीचा समावेश करण्यात येत आहे."

**नोंद**

" अमरावती क्षेत्राच्या उक्त प्रादेशिक योजनेतील मौजे कठोरा बु., ता. जि. अमरावती येथील स. नं. ६/१ पैकी, ६/२ पैकी, ६/३ पैकी मधील ०.८१ हे.आर, स. नं. ८/१/बी, ८/१/डी, ८/२, ८/३, ८/४ मधील ७.७७ हे. आर व स. नं. ९/१, ९/२ मधील २.१४ हे. आर असे एकूण १०.७२ हे. आर क्षेत्र कृषी विभागातून वगळून खालील अटींच्या अधिन राहून, भाग नकाशात दर्शविल्याप्रमाणे रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे."

**अट क्र. १**:—फेरबदलाखालील क्षेत्राचा अभिन्यास करतांना त्यामध्ये अनिवार्य १०% खुल्या जागेव्यतिरिक्त १०% सुविधा क्षेत्र सोडण्यात यावे. (सदर क्षेत्र त्याच प्रयोजनार्थ जमीन मालक/ विकासक यांना विकसित करता येईल.)

**अट क्र. २**:—फेरबदलाखालील क्षेत्रात पायाभूत सुविधा पुरविण्याची जबाबदारी जमीन मालक/विकासकाची राहील. (जसे प्रवेशमार्ग, पाणीपुरवठा, विद्युतपुरवठा इत्यादी)

**अट क्र. ३**:—वलगांव-रेवसा-कठोरा-नांदगांव पेठ रस्ता रा. मा. ४७ या रस्त्याला समांतर १२ मीटर रुंदीचा सेवा रस्ता सोडणे बंधनकारक राहील.

**अट क्र. ४**:—वलगांव-रेवसा-कठोरा-नांदगांव पेठ रस्ता रा. मा. ४७ या रस्त्याचे रुंदीकरण करावयाचे असल्याने रुंदीकरण करतांना कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होणार नाही.

**अट क्र. ५**:—जोड रस्त्याची पातळी ही मुख्य रस्त्याच्या पातळीपेक्षा १५.०० सें.मी. खाली व जोडरस्त्याच्या खाली असलेली मोरी ही १००० मी.मी व्यासाची पाईप मोरी बांधणे बंधनकारक राहील, तसेच रस्त्यावरील पाण्याचा निचरा नजिकच्या नाल्यामध्ये जाण्यास अडथळा येणार नाही.

**अट क्र. ६**:—रस्त्याच्या कडेला १०० झाडाचे वृक्षारोपणाचे उद्दिष्ट देण्यात येत आहे.

**अट क्र. ७** :—मुख्य रस्त्यापासून ते पोच मार्गाकरीता सा. बां. अमरावती यांची वेगळी परवानगी घ्यावी लागेल.

**अट क्र. ८**:—सदर जागा रा. मा. दर्जाच्या रस्त्याकरीता अनागरी क्षेत्रासाठी वाणिज्य प्रयोजनाकरीता रस्त्याच्या मध्यापासून ४०.०० मी. अंतरावर इमारत रेषा व रस्त्याच्या मध्यापासून ५०.०० मी. अंतरावर नियंत्रण रेषा निश्चित करणे बंधनकारक राहील.

**अट क्र. ९**:—अर्जदाराने पावसाच्या पाण्याचा कृत्रिम पुनः भरण्याकरिता भूजल पुनः भरण्याच्या उपाययोजना करीता बंधनपत्र दिलेले आहे. त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक राहील.

**अट क्र. १०**:—ग्रामपंचायत कठोरा बु. यांचे दिनांक २३ एप्रिल २०२१ चे पत्रानुसार रहिवाशांना पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी संबंधित लेआउट धारकाची राहील किंवा संबंधित पाणीपुरवठा विभागाला ग्रामपंचायत कठोरा बु. मार्फत प्रस्ताव पाठविण्यात येईल.

**अट क्र. ११**:—फेरबदलाखालील जमिनीत जर अभिन्यासात भूखंड पाडून विक्री करणे प्रस्तावित असेल तर अभिन्यासातील मूलभूत सुविधांचा विकास व भूखंड विक्रीसाठी खालीलप्रमाणे बंधने राहतील. जिल्हाधिकारी, अमरावती यांनी सदर बाबींवर नियंत्रण ठेवावे.—

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | अभिन्यास अंतिमतः मंजूर झाल्यानंतर | .. | एकूण २५% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील. |
| (ब) | सुमारे ४०% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | .. | एकूण ५०% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील. |
| (क) | सुमारे ६०% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | .. | एकूण ७५% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील. |
| (ड) | सुमारे ८०% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | .. | एकूण ९०% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील. |
| (इ) | सुमारे १००% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | .. | एकूण १००% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील. |

**अट क्र. १२**:—तसेच, जर अभिन्यासात समूह गृहबांधणी योजना विकसित करावयाची असेल तर, जिल्हाधिकारी, अमरावती यांनी विहीत केल्यानुसार सर्व मुलभूत सुविधा विकसित झाल्याशिवाय भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येणार नाही.

वरील कोणत्याही अटींचे उल्लंघन झाल्यास रेखांकन व अकृषक परवानगी रद्द करण्यास पात्र राहील.

उक्त मंजूर फेरबदल दर्शविणारा नकाशा नागरिकांच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत.

(१) सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती.

(२) सहाय्यक संचालक, नगर रचना, अमरावती शाखा, अमरावती.

**रा. दा. लांडे,**

अमरावती :
दिनांक ८ ऑक्टोबर २०२१.

सदस्य सचिव, प्रस्ताव छाननी समिती
तथा सहसंचालक, नगर रचना,
अमरावती विभाग, अमरावती.

---

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १३५.

BY MEMBER SECRETARY, ZONE CHANGE COMMITTEE AND JOINT DIRECTOR OF TOWN PLANNING

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

No. R.P. Amt.-Sect-20(4)-C.R.A. (1)-Meeting-12-JDTPAMT-1195-2021.—

Whereas, the Regional Plan of Amravati Region (hereinafter referred to as "the said Regional Plan") has been sanctioned by Government Urban Development Department under Section 15*(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") *vide* Notification No. TPS-2887-CR-196-UD-13, dated the 29th May1993 and has come into force with effect from the 15th August 1993 ;

And whereas, in the peripheral plan of Amravati in the said Regional Plan, the land admeasuring10.72 Ha. bearing Survey No. 6/1Part, 6/2Part, 6/3Part area 0.81 Ha., 8/1b, 8/1d, 8/2, 8/3, 8/4 Area 7.77 Ha. and Sr. No. 9/1, 9/2 area 2.14 Ha. of Mouje Kathora Bu., Ta. & Dist. Amravati, as shown on the part plan (hereinafter referred to as "the said land") is included in Agriculture Zone ;

And whereas, Government has constituted Zone Change Committee (hereinafter referred to as "the said Committee") *vide* Notification No. TPS-1815-CR-49-15-UD-13, dated 6th May 2015 for zone change proposals of sanctioned Regional Plan up to the Limit of 10.00 Ha. to 25.00 Ha. of land.

And whereas, said committee's meeting was held on 8th June 2021; and after consulting the committee members "said Committee" is of the opinion that the said land in accordance with the provisions of sub-section *(2)* of Section 20 of the said Act. should be deleted from Agricultural Zone and include in Residential Zone, subject to following condition. (hereinafter referred to as the "Proposed Modification").

*Condition No. 1 :* While preparing the layout in respect of the said land under modification, apart from the compulsory 10% open space, 10% space shall be kept for public amenities. (This amenity space can be developed by the Land owner/Developer for the same purpose. )

*Condition No. 2 :* It shall be the responsibility of the concerned Land Owner/Developer to provide all basic infrastructure *i.e.* access Roads, Water Supply, Power Supply *etc.* in the said land under modification.

*Condition No. 3 :* It shall be the responsibility of the Land Owner/Developer to pay premium as decided by the Government *vide* order No. TPS-1815-CR-49-15-UD-13, dated 6th May 2015, dated 11th June 2015 and dated 4th January 2016 also it is necessary to Pay premium on the entire land under this proposal.

*Condition No. 4 :* If, the said land under modification are proposed to be developed by way of plotted layout, then sale of plots shall be monitored by the Collector, in relation to development of civic amenities as per the stages given below.—

| | | |
|---|---|---|
| (i) | After final approval of layout | Sale of 25% of total Plots shall be permissible. |
| (ii) | After completion of 40% of civic Amenities | Sale of 50% of total Plots shall be permissible. |
| (iii) | After completion of 60% of civic Amenities | Sale of 75% of total Plots shall be permissible. |
| (iv) | After completion of 80% of civic Amenities | Sale of 90% of total Plots shall be permissible. |
| (v) | After completion of 100% of civic Amenities | Sale of 100% of total Plots shall be permissible. |

*Condition No. 5 :* If, Group Housing Scheme is proposed in the lay-out, then the occupancy certificate shall not be given unless civic amenities specified by the Collector are fully developed.

*Condition No. 6 :* A 12.00 mt. wide service road shall be provided parallel to the existing Walgaon-Revasa-Kathora-Nandgaon Peth S.H. No, 47.

*Condition No. 7 :* There should be no obstruction whatsoever to the proposed road widening of the existing Walgaon-Revasa-Kathora-Nandgaon Peth S.H. No. 47.

*Condition No. 8 :* The level of the proposed access road to be joined to the main existing road shall be kept 15.00 cm. lower than the level of the said main road. The culvert below the proposed access road shall be constructed as a 1000mm. dia. Pipe culvert and there should be no obstruction to the outflow of water from the road surface into the nearby *nallah.*

*Condition No. 9 :* A target of plantation of minimum 100 tree alongside the road shall be complied with.

*Condition No. 10 :* It shall be binding to procure a permission for construction of an access road to be joined to the existing main road from the Public Works Department, Amravati Office.

*Condition No. 11 :* For rural / non-urban area a building line at a distance of 40.00 mt. and for commercial purpose a control line at a distance of 50.00 mt. respectively from the centre line of a road having a status of a State Highway shall be maintained.

*Condition No. 12 :* The applicant submitted an indemnity bond for making necessary arrangement of rain water harvesting system for recharge of the ground water. The Owner / Developer do the necessary arrangement about this.

*Condition No. 13 :* As per the letter dated 23rd April 2021 issued by the Grampanchayat Kathora Bu., it shall be the responsibility of the concerned developer to provide water supply to the residents in the layout or submit the proposal of water supply scheme to concern department through Grampanchayat Kathora Bu.

In case of non-compliance, layout Approval and Non-Agriculture permission shall be liable to be cancelled.

And, whereas, the notice for the Proposed Modification, under the powers conferred by Section 20*(3)* of the said Act, was published by the Member Secretary, Zone Change Committee, Amravati vide Notice No. R.P. Amt.-Sect-20(3)-C.R.B. (1)- Meeting-11-JDTPAMT-697-2021, Dated 15th June 2021 inviting objections and suggestions from the general public and the Assistant Director of Town Planning, Amravati Branch was appointed as the "Officer" (hereinafter referred to as the "Said Officer") to hear the suggestions and objections received within the stipulated period only and to submit his report on the same to the Member Secretary, Zone Change Committee, Amravati ;

And, whereas, the said Officer submitted his report to the Member Secretary, Zone Change Committee, Amravati *vide* his letter dated 6th August 2021;

And, whereas, the said committee's meeting was held on 8th September 2021 and after consulting the Member Secretary, Zone Change Committee, Amravati & committee members on the report of the said officer, and the "said committee" is of the opinion that the said land should be deleted from Agricultural Zone and include in Residential Zone subject to certain condition ;

And, whereas, as per zone change policy of Government, the owners of the said land have deposited the premium for the area 10.72 Ha. bearing Survey No. 6/1Part, 6/2Part, 6/3Part area 0.81 Ha., S. No. 8/1b, 8/1d, 8/2, 8/3, 8/4 Area 7.77 Ha. and Sr. No. 9/1, 9/2 area 2.14 Ha. of Mouje Kathora Bu., Ta. & Dist. Amravati, in the Government Account Head on 30th September 2021, so Condition No. 3 is fulfilled.

And, whereas, Government by Order No. TPS-1815-CR-49-15-UD-13, dated 11th June 2015 has delegated power to the Joint Director of Town Planning of respective Division to notify under sub-section *(4)* of Section 20 of said Act ;

Now, therefore, in exercise of the power conferred under sub-section *(4)* of Section 20 of the said act, the Joint Director of Town Planning, Amravati Division, Amravati hereby sanctioned the proposed Modification in respect of the said land and for that purpose amends the above referred notification dated the 29th May 1993 as follows :-

" In the Schedule of Modifications appended to the Notification dated the 29th May 1993 sanctioning the said Regional Plan, the following new entry shall be added after the last entry.—"

*ENTRY*

"In the said Regional Plan, the land admeasuring10.72 Ha. bearing Survey No. 6/1Part, 6/2Part, 6/3Part area 0.81 Ha., S. No. 8/1b, 8/1d, 8/2, 8/3, 8/4 Area 7.77 Ha. and Sr. No. 9/1, 9/2 area 2.14 Ha. of Mouje Kathora Bu., Ta. & Dist. Amravati, should be deleted from agricultural zone and included in Residential Zone subject to certain conditions :-"

*Condition No. 1 :* While preparing the layout in respect of the said land under modification, apart from the compulsory 10% open space, 10% space shall be kept for public amenities.

(This amenity space can be developed by the Land owner/Developer for the same pur-

pose. )

*Condition No. 2 :* It shall be the responsibility of the concerned Land Owner/Developer to provide basic infrastructure *i.e.* access Roads, Water Supply, Power Supply *etc.* in the said land under modification.

*Condition No. 3 :* A 12.00 mt. wide service road shall be provided parallel to the existing Walgaon-Revasa-Kathora-Nandgaon Peth S.H. No, 47.

*Condition No. 4 :* There should be no obstruction whatsoever to the proposed road widening of the existiong Walgaon-Revasa-Kathora-Nandgaon Peth S.H. No, 47.

*Condition No. 5 :* The level of the proposed access road to be joined to the main existing road shall be kept 15.00 cm. lower than the level of the said main road. The culvert below the proposed access road shall be constructed as a 1000mm. dia. Pipe culvert and there should be no obstruction to the outflow of water from the road surface into the nearby *nallah.*

*Condition No. 6 :* A target of plantation of minimum 100 tree alongside the road shall be complied with.

*Condition No. 7 :* It shall be binding to procure a permission for construction of an access road to be joined to the existing main road from the Public Works Department, Amravati Office.

*Condition No. 8 :* For rural / non-urban area a building line at a distance of 40.00 mt. and for commercial purpose a control line at a distance of 50.00 mt. respectively from the centre line of a road having a status of a State Highway shall be maintained.

*Condition No. 9 :* The applicant submitted an indemnity bond for making necessary arrangement of rain water harvesting system for recharge of the ground water. The Owner / Developer do the necessary arrangement about this.

*Condition No. 10 :* As per the letter dated 23rd April 2021 issued by the Grampanchayat Kathora Bu., it shall be the responsibility of the concerned developer to provide water supply to the residents in the layout or submit the proposal of water supply scheme to concern department through Grampanchayat Kathora Bu.

*Condition No. 11 :* If, the said lands under modification are proposed to be developed by way of plotted layout, then sale of plots shall be monitored by the Collector, in relation to development of civic amenities as per the stages given below.—

| | | |
|---|---|---|
| (i) | After final approval of layout | Sale of 25% of total Plots shall be permissible. |
| (ii) | After completion of 40% of civic Amenities | Sale of 50% of total Plots shall be permissible. |
| (iii) | After completion of 60% of civic Amenities | Sale of 75% of total Plots shall be permissible. |
| (iv) | After completion of 80% of civic Amenities | Sale of 90% of total Plots shall be permissible. |
| (v) | After completion of 100% of civic Amenities | Sale of 100% of total Plots shall be permissible. |

*Condition No. 12 :* If, Group Housing Scheme is proposed in the lay-out, then the occupancy certificate shall not be given unless civic amenities specified by the Collector are fully developed.

In case breach of any of the above conditions, layout Approval and non-agriculture permission shall be liable to be cancelled.

A copy of the part plan showing the above sanctioned modification shall be kept open for inspection by general public during office hours on all working days for a period of one month at the following offices :-

(1) The Joint Director of Town Planning, Amravati Division, Amravati.

(2) The Assistant Director of Town Planning, Amravati Branch, Amravati.

R. D. LANDE,

Member Secretary, Zone Change Committee

And Joint Director of Town Planning,

Amravati Division, Amravati.

Amravati :

Dated the 8th October 2021.

**पुढील अधिसूचना असाधारण राजपत्र म्हणून त्यांच्यापुढे दर्शविलेल्या दिनांकांना प्रसिद्ध झालेल्या आहेत.**

**१०**

**शुक्रवार, ऑक्टोबर ८, २०२१/ आश्विन १६, शके १९४३**

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु) म. शा. रा., अ. क्र. २८.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**आदेश**

क्रमांक कक्ष १९/प्रस/जिप.पंस.-कावि-६६४-२०२१—

ज्याअर्थी, मा. राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्याकडील जिल्हा परिषद, पंचायत समिती पोट निवडणुकीच्या संबंधात अधिसूचना क्र. रानिआ/जिपपंस-२०२१/प्र.क्र.५/का-७, दि. १३ सप्टेंबर २०२१ व एसईसी-१०९६/सिआर-३४-९६/पीआर, दि. १९ नोव्हेंबर १९९६ अन्वये निवडून आलेल्या जिल्हा परिषद सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिध्द करणे संबंधी तरतूद आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ९(२)(अ) तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषदा निवडणूक नियम, १९६२ मधील ६६(१) अन्वये निवडून आलेल्या सदस्यांची नावे प्रसिध्द करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयुक्त , महाराष्ट्र यांनी त्यांची अधिसूचना क्रमांक एसईसी-१०९६/सिआर-३४-९६/पीआर, दि. १९ नोव्हेंबर १९९६ अन्वये जिल्हाधिकारी यांना प्रदान केले आहे. त्या अधिकाराचा वापर करून मी, नीमा अरोरा, जिल्हाधिकारी, अकोला या प्रगटनाद्वारे असे जाहीर करते की, अकोला जिल्हा परिषदेच्या निवडणूक विभागाच्या दिनांक ०५ ऑक्टोबर २०२१ रोजी घेण्यात आलेल्या पोट निवडणुकीमध्ये खालील अनुसूचित दर्शविलेले उमेदवार त्यांचे समोर नमूद केलेल्या मतदार विभागातून जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून आलेले आहेत.

**अनुसूची**

| अ.क्र. | निवडणुक विभागाचा क्रमांक व नाव | आरक्षण | निवडून आलेल्या सदस्याचे नाव | पक्ष | कायमचा पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | ०१-दानापुर | सर्वसाधारण | काकड गजानन पांडुरंग | इंडियन नॅशनल | मु. पो. सौंदळा, ता. तेल्हारा, |

**अनुसूची**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | काँग्रेस | जि. अकोला. | |
| २ | ०३-अडगांव बु. | सर्वसाधारण (स्त्री) | कोल्हे प्रमोदिनी गोपाल | अपक्ष | मधुबन, बाजारपुरा, वार्ड नं. ३ अडगांव बु., ता. तेल्हारा, जि. अकोला. | |
| ३ | ०४-तळेगांव बु. | सर्वसाधारण (स्त्री) | अढाऊ संगीता नंदकिशोर | वंचित बहुजन आघाडी | मु. शिवाजी नगर, पो. अडगांव बु., ता. तेल्हारा, जि. अकोला. | |
| ४ | १०-अकोलखेड | सर्वसाधारण | निचळ जगन्नाथ गजानन | शिवसेना | मु. पो. अकोलखेड, ता. अकोट, जि. अकोला. | |
| ५ | १५-कुटासा | सर्वसाधारण (स्त्री) | गावंडे स्फूर्ती निखील | प्रहार जनशक्ती पक्ष | मु. लोतखेड, पो. वरूर जऊळका, ता. अकोट, जि. अकोला. | |
| ६ | १७-लाखपुरी | सर्वसाधारण | डोंगरदिवे सम्राट जयराम | अपक्ष | C/o दिवाकर देशमुख, राणा लेआऊट, हातगांव, ता. मुर्तिजापूर, जि. अकोला. | |
| ७ | १८-बपोरी | सर्वसाधारण (स्त्री) | कावरे मायाबाई रामदास | भारतीय जनता पार्टी | मु. पो. भटोरी, ता. मुर्तिजापूर, जि. अकोला. | |
| ८ | २६-घुसर | सर्वसाधारण | इंगळे शंकर किसन | वंचित बहुजन आघाडी | मु. मारोडी, पो. आपोती खुर्द, ता. जि. अकोला. | |
| ९ | २९-कुरणखेड | सर्वसाधारण | बोर्डे सुशांत साहेबराव | वंचित बहुजन आघाडी | मु. पळोसो खुर्द, पळसो बढे, ता. जि. अकोला. | |
| १० | ३०-कानशिवणी | सर्वसाधारण (स्त्री) | अवताडे किरण शिवशंकर | नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी | मु. पो. भांबेरी. ता. तेल्हारा, जि. अकोला. | |
| ११ | ३४-अंदुरा | सर्वसाधारण (स्त्री) | बावणे मिनाताई संजय | वंचित बहुजन आघाडी | मु. पो. हाता, ता. बाळापुर, जि. अकोला. | |
| १२ | ३९-देगांव | सर्वसाधारण | गव्हाणकर रामकुमार नारायणराव | वंचित बहुजन आघाडी | रा. पो. निमकर्दा, ता. बाळापुर, जि. अकोला. | |
| १३ | ४२-दगडपारवा | सर्वसाधारण (स्त्री) | गावंडे सुमन भास्करराव | नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी | मु. पो. वाघजाळी, वरखेड, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला. | |
| १४ | ४८-शिर्ला | सर्वसाधारण | फाटकर सुनील माणिकराव | वंचित बहुजन आघाडी | मु. पो. बाभुळगांव, ता. पातुर, जि. अकोला. | |

अकोला :
दिनांक ७ ऑक्टोबर २०२१.

**नीमा अरोरा** (भा.प्र.से),
जिल्हाधिकारी, अकोला.

---

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु) म. शा. रा., अ. क्र. २९.

## आदेश

क्रमांक कक्ष १९/प्रस/जिप.पंस.-कावि-६६५-२०२१—

ज्याअर्थी, मा. राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्याकडील जिल्हा परिषद, पंचायत समिती पोट निवडणुकीच्या संबंधात अधिसूचना

क्र. रानिआ/जिपपंस-२०२१/प्र.क्र.५/का-७, दि. १३ सप्टेंबर २०२१ व एसईसी-१०९६/सिआर-३४-९६/पीआर, दि. १९ नोव्हेंबर १९९६ अन्वये निवडून आलेल्या जिल्हा परिषद सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिध्द करणे संबंधी तरतूद आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ९(२)(अ) तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषदा निवडणूक नियम, १९६२ मधील ६६(१) अन्वये निवडून आलेल्या सदस्यांची नावे प्रसिध्द करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयुक्त , महाराष्ट्र यांनी त्यांची अधिसूचना क्रमांक एसईसी-१०९६/सिआर-३४-९६/पीआर, दि. १९ नोव्हेंबर १९९६ अन्वये जिल्हाधिकारी यांना प्रदान केले आहे. त्या अधिकाराचा वापर करून मी, नीमा अरोरा, जिल्हाधिकारी, अकोला या प्रगटनाद्वारे असे जाहीर करते की, अकोला जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या तेल्हारा, अकोट, मुर्तिजापुर, अकोला, बाळापुर, बार्शिटाकळी व पातुर पंचायत समितीच्या निर्वाचक गणाच्या दिनांक ०५ ऑक्टोबर २०२१ रोजी घेण्यात आलेल्या पोट निवडणुकीमध्ये खालील अनुसूचित दर्शविलेले उमेदवार त्यांचे समोर नमूद केलेल्या निर्वाचक गणातून पंचायत समिती सदस्य म्हणून निवडून आलेले आहेत.

## अनुसूची

| अ.क्र. | पंचायत समितीचे नांव | निर्वाचक गणाचा क्रमांक व नांव | आरक्षण | निवडून आलेल्या सदस्याचे नांव | पक्ष | कायमचा पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | तेल्हारा | ०३-हिवरखेड | सर्वसाधारण (स्त्री) | अब्दुल सदाफनजमिन आदिल | वंचित बहुजन आघाडी | मु. पो. हिवरखेड, ता. तेल्हारा, जि. अकोला. |
| २ | | ०६-अडगांव बु. | सर्वसाधारण (स्त्री) | काळपांडे उज्ज्वला हेमराज | इंडियन नॅशनल काँग्रेस | ग्राम सचिवालय, पो. अडगाव बु., ता. तेल्हारा, जि. अकोला. |
| ३ | | १३-वाडी अदमपुर | सर्वसाधारण | तिव्हाने अरविंद मनोहर | वंचित बहुजन आघाडी | पो. वाडी अदमपूर, ता. तेल्हारा, जि. अकोला. |
| ४ | | १५-भांबेरी | सर्वसाधारण | उमाळे अरविंद विश्वनाथ | वंचित बहुजन आघाडी | रा. भांबेरी, ता. तेल्हारा, जि. अकोला. |
| ५ | अकोट | १८-पिंप्री खु. | सर्वसाधारण (स्त्री) | काळे राधा प्रल्हाद | वंचित बहुजन आघाडी | मु. एदलापुर, पो. पिंप्री खुर्द, ता. अकोट, जि. अकोला. |
| ६ | | १९-अकोलखेड | सर्वसाधारण | गणभोज सूरज प्रभाकर | शिवसेना | मु. पो. अकोलखेड, ता. अकोट, जि. अकोला. |
| ७ | | २५-मुंडगांव | सर्वसाधारण | दहिभाते ज्ञानेश्वर पुरुषोत्तम | प्रहार जनशक्ती पक्ष | मु. पो. मुंडगाव, ता. अकोट, जि. अकोला. |
| ८ | | २८-रौंदळा | सर्वसाधारण (स्त्री) | वाघोडे हरिदिनी अशोक | शिवसेना | मु. पो. देवरी, ता. अकोट, जि. अकोला. |
| ९ | मुर्तीजापूर | ३४-लाखपुरी | सर्वसाधारण (स्त्री) | सुरजूसे कमल दामोदर | शिवसेना | मु. पो. लाखपुरी, ता. मुर्तीजापूर, जि. अकोला. |
| १० | | ३५-ब्रम्ही खु. | सर्वसाधारण (स्त्री) | सरोदे उज्वला अनिल | वंचित बहुजन आघाडी | मु. खापरवाडा, पो. दुर्गवाडा, ता. मुर्तिजापूर, जि. अकोला. |
| ११ | | ३९-माना | सर्वसाधारण | घुरडे रवींद्र माणिकराव | वंचित बहुजन आघाडी | मु. पो. माना, ता. मुर्तिजापूर, जि. अकोला. |

**अनुसूची**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| १२ | | ४६-कानडी | सर्वसाधारण | घाटे गोपाल भीमराव | वंचित बहुजन आघाडी | मु. राजुरा घाटे, पो. निंभा, ता. मुर्तिजापूर, जि. अकोला. |
| १३ | अकोला | ४९-दहिहांडा | सर्वसाधारण | वानखडे गजानन भिकारामजी | शिवसेना | मु. पो. दहिहांडा, ता. जि. अकोला. |
| १४ | | ५२-घूसर | सर्वसाधारण (स्त्री) | गव्हाळे निकिता गणेश | वंचित बहुजन आघाडी | मु. पो. घूसर, ता. जि. अकोला. |
| १५ | | ५७-पळसो | सर्वसाधारण (स्त्री) | नागे शोभा वसंतराव | वंचित बहुजन आघाडी | मु. पो. पैलपाडा, ता. जि. अकोला. |
| १६ | | ५८-कुरणखेड | सर्वसाधारण (स्त्री) | ठाकरे सुषमा प्रशांत | भारतीय जनता पार्टी | नवीन वस्ती कुरणखेड, ता. जि. अकोला. |
| १७ | | ६६-चिखलगांव | सर्वसाधारण | थोरात सचिन दिपक | वंचित बहुजन आघाडी | मु. पो. चिखलगाव, ता. जि. अकोला. |
| १८ | बाळापूर | ७२-निमकर्दा | सर्वसाधारण (स्त्री) | कवरकार राजकन्या रामकृष्ण | वंचित बहुजन आघाडी | मु. पो. निमकर्दा, ता. बाळापूर, जि. अकोला. |
| १९ | | ७५-पारस भाग १ | सर्वसाधारण | अमजद हुसेन शेख महेबूब | ऑल इंडिया मजलिस ए इत्तेहादुल मुस्लिमीन | ईदगा प्लॉट पारस, ता. बाळापूर, जि. अकोला. |
| २० | | ७८-देगांव | सर्वसाधारण (स्त्री) | सोनटक्के शारदा रामकृष्ण | वंचित बहुजन आघाडी | मु. पो. देगांव, ता. बाळापूर, जि. अकोला. |
| २१ | | ८०-वाडेगांव भाग २ | सर्वसाधारण | अफसर खान इसा खा | वंचित बहुजन आघाडी | मु. पो. वाडेगांव, ता. बाळापूर, जि. अकोला. |
| २२ | बार्शिटाकळी | ८३-दगडपारवा | सर्वसाधारण (स्त्री) | जाधव संगिता मनोज | भारतीय जनता पार्टी | मु. पो. दगडपारवा, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला. |
| २३ | | ८६-मो-हळ | सर्वसाधारण | चौधरी संदिप लक्ष्मनराव | भारतीय जनता पार्टी | मु. पो. महादेव, मंदिराजवळ, खेर्डा, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला. |
| २४ | | ८९-महान | सर्वसाधारण | देशपांडे किशोर विश्वासराव | अपक्ष | मु. पो. जैनपुरा महान, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला. |
| २५ | | ९१-पुनोती बु. | सर्वसाधारण (स्त्री) | मानकर प्रणिता दिनेश | वंचित बहुजन आघाडी | मु. पो. पुनोती खुर्द, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला. |
| २६ | पातूर | ९६-शिर्ला | सर्वसाधारण (स्त्री) | ढोणे मनीषा श्रीकांत | शिवसेना | रा. आरीफ नगर, शिर्ला जिरायत पातूर, |

**अनुसूची**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | ता. पातूर, जि. अकोला. |
| २७ | | ९७-खानापूर | सर्वसाधारण (स्त्री) | टप्पे सुनिता अर्जुन | वंचित बहुजन आघाडी | रा. कोठारी खुर्द, पो. खानापूर, ता. पातूर, जि. अकोला. |
| २८ | | १०५-आलेगांव | सर्वसाधारण | खान इमरान खान मुमताज खान | वंचित बहुजन आघाडी | मु. पो. आलेगाव, ता. पातूर, जि. अकोला. |

अकोला :
दिनांक ७ ऑक्टोबर २०२१.

**नीमा अरोरा** (भा.प्र.से),
जिल्हाधिकारी, अकोला.

---

## १० (२)

## शुक्रवार, ऑक्टोबर ८, २०२१/ आश्विन १६, शके १९४३

भाग १-अ (असा.) (अ.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. ३०.

### जिल्हाधिकारी, यांजकडून

### अधिसूचना

क्रमांक कक्ष-२१-जि.प.पं.स.निवड.-कावि-३१२-२०२१.—

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ९, पोट कलम (२) चा खंड (अ) व महाराष्ट्र जिल्हा परिषदा (निवडणूक विभाग व निवडणुका घेणे) नियम, १९६२, मधील नियम ६६ आणि राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र शासन राजपत्र क्र. एसीई-१०९६/सीआर-३४/९६/पीआर, दिनांक १९ नोव्हेंबर १९९६ अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, शण्मुगराजन एस., जिल्हाधिकारी, वाशिम, असे जाहीर करतो की, वाशिम जिल्हा परिषद पोट निवडणुकीत खालील नमूद केलेले उमेदवार हे त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या जिल्हा परिषद निवडणूक विभागातून, वाशिम जिल्हा परिषदेवर सभासद म्हणून निवडून आले आहेत.—

**अनुसूची**

| अ. क्र. | ज्या निवडणूक विभागातून निवडून आले त्या गटाचे नांव | निवडून आलेल्या सदस्यांची नावे | निवडून आलेल्या सदस्यांचा संपूर्ण पत्ता |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | २-भामदेवी | लळे वैशाली प्रमोद | मु. धोत्रा देश, पोस्ट भामदेवी, ता. कारंजा, जि. वाशिम. |
| २ | १०-कुपटा | ठाकरे उमेश वसंतराव | रा. जनुना, ता. मानोरा, जि. वाशिम. |
| ३ | ११-तळप | गावंडे शोभा सुरेश | रा. रामतिर्थ, ता. मानोरा, जि. वाशिम. |
| ४ | १५-फुलउमरी | चव्हाण सुरेखा अशोक | रा. भुली, ता. मानोरा, जि. वाशिम. |

**अनुसूची—**चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ५ | १९-दाभा | राठोड राजेश कनिराम | मु.पो. धानोरा खु., ता. मंगरुळपीर, जि. वाशिम. |
| ६ | २२-कंझरा | कोठाळे सुनिता पांडुरंग | मु.पो. शेलु बाजार, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम. |
| ७ | २४-आसेगांव | ठाकरे चंद्रकांत सुभाषराव | मु.पो. कासोळा, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम. |
| ८ | २८-पांगरी नवघरे | लहाने लक्ष्मी सुनील | मु.पो. करंजी, ता. मालेगांव जि. वाशिम. |
| ९ | ३७-कवठा खु. | सरनाईक वैभव प्रतापराव | रा.पो. चिखली, ता. रिसोड, जि. वाशिम. |
| १० | ३९-गोभणी | भुतेकर पुजा अमोल | मु. देगाव, पो. लिंगा कोतवाल, ता. रिसोड जि. वाशिम. |
| ११ | ४१-भरजहागीर | पाटील अमित बाबाराव | मु.पो. शेलू खडसे, ता. रिसोड, जि. वाशिम. |
| १२ | ४३-काटा | देशमुख संध्या विरेंद्र | मु.पो. काटा, ता. जि. वाशिम. |
| १३ | ४४-पार्डी टकमोर | चौधरी सरस्वती मोहन | मु.पो. पार्डी टकमोर, ता. जि. वाशिम. |
| १४ | ५०-उकळीपेन | मापारी सुरेश काशिराम | मु. धानोरा, पो. कळंबा महाली, ता.जि. वाशिम. |

वाशिम :
दिनांक ८ ऑक्टोबर २०२१.

**शण्मुगराजन एस.,**
जिल्हाधिकारी, वाशिम.

---

भाग १-अ (असा.) (अ.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. ३१.

## अधिसूचना

क्रमांक कक्ष-२१-जि.प.पं.स.निवड.-कावि-३१३-२०२१.—

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ५७, पोट-कलम (३) महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण व निवडणूक घेणे) नियम, १९६२, मधील नियम ६० आणि राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र शासन राजपत्र क्र. एसीई-१०९६/सीआर-३४/९६/पीआर, दिनांक १९ नोव्हेंबर १९९६ अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, शण्मुगराजन एस., जिल्हाधिकारी, वाशिम, असे जाहीर करतो की, खाली नमूद केलेले उमेदवार हे त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या निर्वाचक गणातून निवडून आल्याचे प्रसिध्द करीत आहे.–

**अनुसूची**

| अ. क्र. | ज्या निर्वाचक गणातून निवडून आले त्या गटाचे नाव | निवडून आलेल्या सदस्यांची नावे | निवडून आलेल्या सदस्यांचा संपूर्ण पत्ता |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | **पंचायत समिती, कारंजा** | |
| १ | ४-मोहगव्हाण | ढाकुलकर किशोर रामकृष्ण | मु.पो. लोणी अरब, ता. कारंजा, जि. वाशिम. |
| २ | ७-उंबर्डा बाजार | हळदे लक्ष्मीबाई वसंत | मु.पो. उंबर्डा बा., ता. कारंजा, जि. वाशिम. |
| ३ | १३-पोहा | चव्हाण कलाबाई किसन | मु.पो. पोहा, ता. कारंजा, जि. वाशिम. |
| ४ | १५-धामणी खडी | वाडेकर दिनेश यशवंत | मु.पो. धामणी खडी, ता. कारंजा, जि. वाशिम. |
| | | **पंचायत समिती, मानोरा** | |
| १ | २०-धामणी | म्हातारमारे गोविंदराव मारोती | रा. हिवरा बु., ता. मानोरा, जि. वाशिम. |
| २ | २४-कोंडोली | राठोड छाया मनोहर | रा. सोमनाथनगर, ता. मानोरा, जि. वाशिम. |

**अनुसूची—**चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ३ | २६-गिरोली | चव्हाण सैजल गोविंदराव | रा. गव्हा, ता. मानोरा, जि. वाशिम. |
| ४ | २७-शेंदुरजना | जाधव सुजाता अरुण | रा. शेंदुरजना, ता. मानोरा, जि. वाशिम. |
| | | **पंचायत समिती, मंगरुळपीर** | |
| १ | ४०-पेडगांव | वैद्य बंडू भिकाजी | मु.पो. पेडगाव, ता. मंगरुळपीर, जि वाशिम. |
| २ | ४२-वनोजा | राठोड अनिल रामचंद्र | मु. माळशेलु ,पो. टिटवा, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम. |
| ३ | ४५-कासोळा | ठाकरे राधिका श्रीकांत | मु.पो. कासोळा, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम. |
| ४ | ४८-सनगांव | राठोड अरुणा ज्योतीराम | मु. रामगड, पो. शेगी, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम. |
| | | **पंचायत समिती, मालेगांव** | |
| १ | ४९-मारसुळ | घुगे अरुणराव शंकरराव | मु.पो. मारसुळ, ता. मालेगांव, जि. वाशिम. |
| २ | ५३-जऊळका | घुगे संजीवनी रंजीतराव | मु.पो. उडी, ता. मालेगांव, जि. वाशिम. |
| ३ | ५४-जोडगव्हाण | जाधव निर्मला विष्णू | मु.पो. रामनगर, ता. मालेगांव, जि. वाशिम. |
| ४ | ६४-शिरपूर-२ | परसुवाले इमरान इमाम | मु.पो. शिरपूर, ता. मालेगांव, जि. वाशिम. |
| ५ | ६६-खंडाळा शिंदे | वाघ किरण शरद | मु. वाघी बु., पो. खंडाळा शिंदे, ता. मालेगांव, जि. वाशिम. |
| | | **पंचायत समिती, रिसोड** | |
| १ | ७३-कवठा खु. | हरीमकर गणेश ज्ञानबा | रा.पो. कवठा खु., ता. रिसोड, जि. वाशिम. |
| २ | ७५-हराळ | खाडे लताबाई विष्णू | रा.पो. हराळ, ता. रिसोड, जि. वाशिम. |
| ३ | ७९-वाकद | हाडे केशरबाई दिनकरराव | रा. गोहगाव, पो. महागाव, ता. रिसोड, जि. वाशिम. |
| ४ | ८०-महागाव | बोडखे राहुल मनोहर | रा.पो. धोडप बु., ता. रिसोड, जि. वाशिम. |
| ५ | ८२-मोप | नरवाडे सुवर्णा शैलेश | रा.पो. मोप, ता. रिसोड, जि. वाशिम. |
| | | **पंचायत समिती, वाशिम** | |
| १ | ९०-फाळेगांव थेट | वानखेडे सावित्रीबाई गोविंदराव | मु.पो. पार्डी आसरा, ता. जि. वाशिम. |
| २ | ९२-कळंबा महाली | महाले महादेव मोतीराम | मु.पो. कळंबा महाली, ता. जि. वाशिम . |
| ३ | १००- उकळीपेन | खोडके मंगला नारायण | मु.पो. उकळीपेन, ता. जि. वाशिम. |
| ४ | १०१-अनसिंग | मोहम्मद खैरुन्निसा हनीफ | मु. पो. अनसिंग, ता.जि. वाशिम. |
| ५ | १०२- पिंपळगांव | काटेकर प्रयागबाई रामकृष्ण | मु. एकांबा, पो. अनसिंग, ता. जि. वाशिम. |

वाशिम :
दिनांक ८ ऑक्टोबर २०२१.

**शण्मुगराजन एस.,**
जिल्हाधिकारी, वाशिम.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001. AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

अ.-एक-अ-४ (१६२६).